● शनिवार, दि. २५ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १७७ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282






## संपादकीय

### राष्ट्रीय मतदार दिन

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत हे आपणा सर्वांना माहीतच आहे या दिवशी देशभक्ती ओसंडून वाहत असते पण या दिवसा इतकाच आजचा दिवसही तितकाच म्हत्वाचा आहे हे अनेक लोकांना माहीत नाही. आज २५ जानेवारी आज राष्ट्रीय मतदार दिन.आजच्याच दिवशी भारतीय लोकशाहीचा पाया रचला गेला. आजच्याच दिवशी म्हणजे २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली म्हणून हा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. भारतीय लोकशाहीने प्रत्येक सुजाण नागरिकाला मतदानाचा मूलभूत हक्क बहाल केला आहे. त्यामुळे मतदार यादीत नाव नोंदवून प्रत्येक नागरिकांनी निवडणुकीत आपले मतदान नोंदवून लोकशाही बळकट करावी असा उद्देश या दिवसामागे आहे. म्हणून या दिवशी भारत निवडणूक आयोग विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन मतदानासंदर्भात जनजागृती करते. या दिवशी १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवीन मतदारांची नोंद करून त्यांना भारत निवडणूक आयोगाचे ओळखपत्र दिले जाते. मतदान हे प्रत्येक सुजाण नागरिकांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकांना संविधानाच्या अनुच्छेद ३२६ नुसार मतदानाचा हक्क दिला आहे. मतदान करणे ही देखील देशसेवाच आहे. त्यामुळे जास्तीतजास्त लोकांनी मतदान करुन भारतीय लोकशाहीला बळकट करायला हवे मात्र आपल्या देशात आजही मतदार मतदानाबाबत गंभीर आहेत असे दिसत नाही. घटनाकारांनी मतदानाचा अधिकार बहाल करून देशवासियांना खूप मोठे अस्त्र दिले आहे पण दुर्दैवाने आजही लोकांना त्याचे महत्व नाही म्हणूनच आपल्या देशात कोणत्याही निवडणुकीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होत नाही याचाच अर्थ देशातील ४० टक्के मतदार मतदान करित नाहीत. भारतीय मतदारांचा मतदानाबाबतचा हा निरुत्साह लोकशाहीला मारक आहे. विशेष म्हणजे सुशिक्षित वर्गातच मतदानाविषयी निरुत्साह दिसून येतो. मतदानादिवशी राष्ट्रीय सुट्टी असते या दिवशी मतदान करण्याऐवजी सहकुटुंब सहलीला जाण्याचा ट्रेंड सुशिक्षित वर्गात दिसून येतो आपण एकट्याने मतदान केले नाही तर काय फरक पडणार असाच आविर्भाव या लोकांमध्ये दिसून येतो. जे मतदान करतात त्यातील काही लोक मतदान करण्याऐवजी आपल्या मताची विक्री करतात. रोटी, बोटी, आणि चपटीसाठी काही जण आपले मत अक्षरशः विकतात. अर्थात सर्वचजण असे करतात असे नाही. बहुतेक जण विचार करुन आपल्या देशासाठी, समाजासाठी योग्य अशा उमेदवाराला मतदान करतात हे ही नाकारून चालणार नाही अशा लोकांची संख्या वाढली पाहिजे. लक्ष्मी दर्शन झाल्यानंतरच मतदान करणारे लोक बाबासाहेबांनी दिलेल्या या अस्त्राचा दुरुपयोग करतात. या लोकांमुळेच लोकशाही कलंकित होत आहे. बाबासाहेबांनी हे अस्त्र आपल्या हाती देण्यासाठी किती कष्ट सोसले याचीही जाणीव या लोकांना नाही. संविधानात मतदानाचा मूलभूत हक्क समाविष्ट करून बाबासाहेबांनी आपल्याला सर्वात मोठा हक्क मिळवून दिला आहे. आपलव हा मतदानाचा पवित्र हक्क बजावून प्रत्येकाने लोकशाही बळकट करायला हवी. प्रत्येकाने मतदानाचा हक्क जबाबदारीने बाजावल्यास देशाचे भविष्य बदलू शकते. त्यामुळे प्रत्येकाने निराशावादी भूमिका सोडून जागरूकतेने व स्वयंस्फूर्तीने प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कार्यामध्ये आपला खारीचा वाटा उचलायला हवा. लोकशाहीचे बळकटीकरण करावयाचे असेल तर जागरुक मतदारांचा एक मोठा वर्ग अस्तिवात येणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला देश विकसनशीलतेकडून विकसित देश होण्याकडे निश्चितच मदत होईल. १८ वर्षांपुढील सर्व सुजाण नागरिकांनी आगामी निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावला तरच राष्ट्रीय मतदार दिन साजरा केल्याचे सार्थक होईल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# ‘राष्ट्रीय मतदार दिवस’ : मतदार जागृती

भारत निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी, १९५० रोजी झाली असून, स्थापनेचा ‘२५ जानेवारी’ हा दिवस ‘राष्ट्रीय मतदार दिवस’ म्हणून साजरा करण्यात येतो. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश मतदार असल्याचा अभिमान मतदारास असावा आणि त्यातून बळकट लोकशाहीतील मोठा सहभाग नोंदवता यावा हा आहे.

भारतीय लोकशाही गणराज्यात प्रत्येक भारतीय नागरिकाला सार्वत्रिक तथा पोट निवडणुकीत मतदानाचा मुलभूत हक्क बहाल करण्यात आलेला आहे. त्यामुळे मतदार यादीत नांव नोंदवून मतदान करण्याचे कर्तव्य पार पाडून लोकशाही बळकट करण्याचा वाटा उचलण्याची संधी प्रत्येक भारतीय नागरिकाला आहे.

भारतातील युवा मतदारांना सक्रीय राजनीती मध्ये भाग घेण्यास प्रोत्साहीत करण्याकरिता सन २०११ पासून भारत निवडणूक आयोगाने ‘२५ जानेवारी’ हा दिवस ’राष्ट्रीय मतदार दिवस’ म्हणून दरवर्षी साजरा करण्यात यावा, असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार यावर्षी १५ वा राष्ट्रीय मतदान दिवस साजरा करण्यात येत आहे. राष्ट्रीय मतदार दिवसाची यावर्षाची थीम मतदानासारखे काही नाही, मी खात्रीने मतदान करतो'' ही आहे. जी निवडणूक प्रक्रियेतील सहभागाच्या महत्त्वावर जोर देते, आणि मतदारांना त्यांच्या मताधिकाराचा वापर करण्यात अभिमान बाळगण्यास प्रोत्साहित करते.

देशातील प्रत्येक नागरिकास आपण या देशाचे सुजाण नागरिक असून मतदान करणे हा आपला मुलभूत हक्क असल्याची जाणीव होण्याकरीता या राष्ट्रीय मतदार दिवसाचे महत्व आहे. या ’राष्ट्रीय मतदार दिवस’ निमित्त १८ वर्ष पूर्ण होत असलेल्या आणि १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवयुवक युवतींना मतदारांना तसेच ज्या नागरिकांनी अद्यापही यादीत आपले नांव नोंदविले नाही अशा नागरिकांना मतदार यादीत आपले नांव नोंदवून ओळख पत्र भारत निवडणूक आयोगामार्फत देण्यात येते. मतदार म्हणुन नाव नोंदवण्यासाठी या वर्षात ४ संधी असणार आहेत. जर तुम्ही २०२६ च्या जानेवारी, एप्रिल, जुलै आणि ऑक्टोबर महिन्याच्या १ तारखेला किंवा त्याच्या आधी १८ वर्षाचे होणार असाल तर अर्ज क्र. ६ भरुन आगाऊ मतदार नोंदणी करु शकता.

दिनांक ०१ जुलै, २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह यादीच्या द्वितीय विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमातंर्गत दि. ३० ऑक्टोबर, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या मतदार यादीनुसार जालना जिल्ह्यातील पाच मतदार संघामध्ये एकूण १६ लाख ५२ हजार ५११ मतदार आहेत. त्यापैकी स्त्री मतदार ७ लाख ९२ हजार १६६ तर पुरुष मतदार ८ लाख ६० हजार ३०३ आणि इतर ४२ मतदार आहेत. या राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त स्त्री मतदारांची संख्या पुरुष मतदारांच्या बरोबर आणण्याचा प्रयत्न आहे. कारण जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या कमी असून ज्या महिलांनी मतदार यादीत नांव नोंदविले नाही त्यांनी आता या कार्यक्रमानिमित्त महिला मतदारांनी नावे नोंदविली पाहिजेत.

जालना जिल्ह्यात दि. १ जूलै, २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादींची द्वितीय विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमातंर्गत दिनांक ०६ ऑगसट, २०२४ ते २० ऑगस्ट, २०२४ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात आल्या. पुनरिक्षण कार्यक्रमाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. एकूण १९ हजार ९३७ दावे व हरकती प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी १७ हजार ७०० निकाली काढण्यात आले आहेत. नव्याने नोंदणी झालेल्या १० हजार ८४७ तसेच नोंदीतील दुरूस्ती केलेल्या ५ हजार ०३४ अशा एकूण १५ हजार ८८१ मतदारांना राष्ट्रीय मतदार दिवस-२०२५ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने नव्यानेच जारी केलेले स्मार्टसाइज प्लॅस्टीक मतदार ओळखपत्राचे (झतउ-एझखउ) वाटप पोस्ट ऑफिसमार्फत करण्यात येणार आहे. सदर विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमात १ हजार ८१९ मतदारांची वगळणी करण्यात आली आहे. मतदार यादीमध्ये ६ हजार ८७५ मतदारांची वाढ झाली आहे. त्यामुळे आता एकूण मतदारांची संख्या १६ लाख ५२ हजार ५११ एवढी झाली आहे.

जालना जिल्ह्याची सन-२०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या १८ लाख ३६ हजार ८६ इतकी असून जानेवारी, २०२४ ची अनुमानित (झीक्षशलींशव) लोकसंख्या २२ लाख १९ हजार ८९५ इतकी आहे. त्यामध्ये एकूण मतदार १६ लाख ५२ हजार ५११ मतदार आहेत. लोकसंख्येशी मतदाराचे प्रमाण ७४.४० टक्के आहे. मतदारांनी आपले नाव अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात आलेल्या मतदार यादीत असल्याबाबत खात्री करावी.

वयाची १८ वर्ष पुर्ण झालेल्या अधिकाधिक तरूणांनी छायाचित्र मतदार याद्यांचा सततचा पुनरिक्षण कार्यक्रम-२०२५ च्या कालावधीत आपली नावे मतदार यादीत नोंदविण्यासाठी, तसेच मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांनी, मतदार यादीत दुबार नावे असलेल्या मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यासाठी संबधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) / संबंधीत तहसिलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी / संबंधीत उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे विहीत नमुन्यातील अर्ज सादर करावेत किंवा http://www.nvsp.in/ या संकेतस्थळावरून ऑनलाईन सादर करावेत. अधिक माहितीसाठी https://ceo.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळाला भेट द्यावी. या मतदार दिवसाच्या कार्यक्रमानिमित्त नवीन मतदारांना निमंत्रित करण्यात येणार आहे. त्यांना या कार्यक्रमात मतदार ओळखपत्र, बिल्ले, प्रदान करुन प्रतिज्ञा दिली जाणार आहे. तसेच जिल्ह्यात राष्ट्रीय मतदार दिवसाबाबत विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे.

येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीत आपण आपल्या लोक प्रतिनीधीस मतदान करण्याची संधी गमावणे म्हणजे आपण आपला भारतीय नागरिक असल्याचा हक्क गमावल्यासारखे आहे ! तर चला ! आपण सर्व भारतीय नागरिक या राष्ट्रीय मतदार दिवसानिमत्त आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करुन आपला मतदानाचा हक्क बजावण्यास सज्ज होऊ या!

**अरुण सूर्यवंशी**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**जालना**



**बदनापूर तालुक्यातील शेलगाव येथे केंद्रस्तरीय क्रिडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा पीरसावंगी शाळेच्या विद्यार्थ्यांनी खो-खो च्या चारही गटात प्रथम, कब्बडी दोन गटात प्रथम व दोन द्वितीय, रनिंगमध्ये चार इव्हेंट प्रथम, एकूण १० इव्हेंट तालुकास्तरास पात्र असे घवघवीत यश मिळाल्याबद्दल खेळाडू विद्यार्थ्यांचा गावकरी बांधवाकडून शाळास्तरावर सत्कार करण्यात आला.**

## अनुसूचित जातीव जमाती अत्याचार प्रतिबंध अंमलबजावणी संदर्भात बदनापूरात एक दिवसीय कार्यशाळा



**बदनापूर । प्रतिनिधी -** अनुसूचित जातीव जमाती अत्याचार प्रतिबंध (अॅट्रॉसिटी ) १९८९ अंमलबजावणी संदर्भात बदनापूर पंचायत समितीत एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर उपस्थित उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी ज्योती राठोड, अॅड. जे.एस भुतेकर सरकारी वकिल अॅड. एस.एस.किनगावकर यांनी कायद्याअंतर्गत भारतीय संविधान कलम १४ अन्वये माहिती दिली. या कार्यशाळेकरीता उपविभागीय अधिकारी, पोलिस अधिकारी, गट विकास अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पोलिस कर्मचारी, विद्यार्थी, नागरीक पंचायत समितीतील काम करणारे कर्मचारी उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वीतेसाठी कार्यालयातील कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## आर्थिक श्रीमंती बरोबरच सांस्कृतिक श्रीमंती महत्वाची - देवेंद्र भुजबळ

**नवी मुंबई । प्रतिनिधी -** माणसाला, समाजाला आणि देशालाही आपल्या भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी आर्थिक श्रीमंती महत्वाची असली तरी त्या बरोबरच सांस्कृतिक श्रीमंतीलाही तेव्हढेच महत्व दिले तरच खऱ्या अर्थाने आपले जीवन श्रीमंत होईल,असे मत निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांनी व्यक्त केले. ते नवी मुंबईतील मोहिनी आर्ट अॅक्ेडमीने २५ व्या रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केल्याच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



नवी मुंबई सारख्या नव्या शहरात सांस्कृतिक, सामाजिक वातावरण निर्माण करण्याची,ते जोपासना करण्याची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन करून गेली २४ वर्षे लेखक, दिग्दर्शक, नाटककार श्री रवींद्र वाडकर अत्यंत निस्पृहपणे हे कार्य करीत असल्याबद्दल त्यांच्या विषयी गौरवोद्गार काढले.

रौप्य महोत्सवी वर्षातील विविध उपक्रमांचा प्रारंभ रवींद्र वाडकर लिखित अर्धरात कलली या दीर्घांकाचे अभिवाचन करून करण्यात आला. या अभिवाचनात वैशाली पाटील, दिव्या चौधरी - पगार, आरती गुरव, यश आर्या, योगेश कांबळी आणि रवींद्र वाडकर यांनी सहभाग घेतला होता. तर सुनील पगार यांनी संगीत संयोजन केले होते. अभिवाचन करण्यात आलेले दीर्घांक लवकरच रसिक प्रेक्षकांना रंगभूमीवर पहायला मिळणार असल्याची घोषणा रवींद्र वाडकर यांनी यावेळी केली.तसेच या प्रसंगी रवींद्र वाडकर लिखित अर्धरात कलली या गीताचा ऑडिओ तर वाट रानातून चाले या गीताचा अल्बम व्हिडीओ अल्बम प्रकाशित करण्यात आला. अॅक्ेडमीच्या २५ व्या रौप्य महोत्सवी वर्षांत अनेक एकांकिका, दीर्घांक, अल्बम साँग, लघुपटाची निर्मिती अशा विविध उपक्रमातून नवोदितांना संधी देण्याचा मानस असल्याचे यावेळी श्री रवींद्र वाडकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला रवींद्र वाडकर यांच्या आईच्या प्रतिमेला पुष्पअर्पण करून व श्री. नटराजचे पूजन करून अभिवाचनाला सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला अभिनेता, चित्रपट निर्माते सुनील तांबे, चित्रपट निर्मात्या लिलावती अंबावले, आयाम परफॉर्मिंग स्पेसच्या संचालिका वैशाली पाटील आदी उपस्थित होते.

## लावणी परिसरातील दोन नवीन पुलाच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाची चौकशीची मागणी

**मंठा । प्रतिनिधी -** वृत्तसंकलन सार्वजनिक बांधकाम विभाग अधीक्षक अभियंत्यांना ज्ञानेश्वर खरात यांची निवेदन निवेदनात असे म्हटले आहे की वाटुर ते वैद्यवडगाव रोडवरील लावनी परिसरात दोन पुलाचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असल्या बाबत. निवेदनात पुढे असे म्हटले आहे की वादुर ते जयपूर या रोडचे डांबरीकरणाचे काम चालू आहे सदरील रोडदोन पुलाचे देखील काम आपल्या कार्यालया मार्फत चालू आहे परंतू सदरील काम हे नियम प्रमाणे होत नाही काम हे अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे प्रत्यक्ष दर्शणी दिसून येत आहे.

काम अंदाजपत्रकाप्रमाणे होत नाही, कामावर सिमेट व पाण्याचे प्रमाण अतिशय कमी आहे तर अंदाजत्रकामध्ये नमुद केल्या पेक्षा कमी जाडीचा गज (स्टिल) कामवर वापरण्यात येत आहे.या बाबत संबीधत यंत्रणेला विचारणा केली असता ते म्हणतात की, तुम्हाला काय करायचे आहे या कामवरुन आम्हाला साहेबांनी सांगीतले तसे काम चालू आहे तुमचा आणि या कामचा काय संबध त्यामुळे येथे कामात दखल देवू नका असे उध्दटपणे ऐकावयास मिळाले आहे.

काम अतिशय निकृष्ट दर्जाचे होत आहेत्यामुळे तात्काळ पाहणी व चौंकशी -करुन सदरील काम जो पर्यत अंदाजपत्रका प्रमाणे पूर्ण होत नाही तो पर्यत सदरील कामाचे उद्देयक देण्यात येवू नये नसता आपल्या कार्यालया समोर आमरण उपोषण करण्यात येईल - याची नोंद घ्यावी, या निवेदनावर न्यानेश्वर खरात यांची सही आहे.

## कार्यालयात हजर नसणाऱ्या अधिकाऱ्याच्या खुर्चीला हार

### मनसे कामगार सेनेचे अनोखे आंदोलन




**जालना । प्रतिनिधी -** येथील जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा जालना प्रकल्प संचालक (PD) सुनीलकुमार पठारे हे नेहेमीच कार्यालयात गैरहजर असतात. त्यामुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या ग्रामस्थांची कामे होत नाहीत. त्यामुळे मनसे कामगार सेनेच्या वतीने त्यांच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून अनोखे आंदोलन करण्यात आले. गेल्या अडीच महिन्यांपासून हे अधिकारी कार्यालयात बसत नाहीत, सध्या घरकुलाची कामाला सुरुवात होत आहे. मंजुरी मिळाली आहे. यासाठी ग्रामीण भागातून येणाऱ्या ग्रामस्थांना योग्य ते मार्गदर्शन मिळत नसल्याचा आरोप मनसे कामगार सेनेच्यावतीने करण्यात आला. यावेळी मनसे कामगार सेनेचे जिल्हा सचिव राम पाटोळे यांच्यासह अमोल मिसळ, महेश लोखंडे आदींची उपस्थिती होती.

## महाकुंभ मेळासाठी जाफराबाद तालुक्यातून मधून शंभर कार्यकर्ते रवाना

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे अध्यक्ष डॉक्टर प्रवीण भाई तोगडिया यांच्या आदेशाने जाफराबाद परिसरातील १०५ बजरंगी प्रयागराज महा कुंभास रवाना झाले छत्रपती शिवाजी महाराज चौक जय श्रीराम च्या घोषणाने दणाणले डॉक्टर प्रवीण भाई तोगडिया यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयागराज कुंभमेळ्यासाठी जाफराबाद परिसरातून शंभराच्या वर बजरंगी रवाना झाले आहे डॉक्टर तोगडिया यांनी प्रयागराज महा कुंभा चे ठिकाणी भाविकांच्या व्यवस्थेसाठी या बजरंगींना आमंत्रित केले आहे त्यानुसार येथून २१ जानेवारी रोजी रात्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्व बजरंगी एकत्र येऊन रवाना झाले त्यामध्ये जाफराबाद पुर्णापूर टेंभुर्णी सावरगाव देऊळगाव राजा सिपोरा येथील बजरंगी सामील आहे डॉक्टर तोगडिया यांनी महा कुंभ मेळ्यामध्ये एक कोटी हिंदूंना अन्नदान ८००० लोकांची राहण्याची व्यवस्था एक कोटी लोकांना नाश्ता अशी व्यवस्था केलेली आहे या यात्रेमध्ये हिंदू संघटन राष्ट्रीय बजरंग दल विश्व हिंदू परिषद या या हिंदू संघटनेचे कार्यकर्ते कुंभमेळ्यास रवाना झाले आहे जाफराबाद स्थानिक मधून दीपक ठाकूर सागर खंडेलवाल रुपेश कायस्थ नीरज शुक्ला योगेश भारद्वाज यांचा समावेश आहे देवगिरी प्रांत उपाध्यक्ष अविनाश देशमाने यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखालीहे बजरंगी प्रयागराज महा कुंभ यात्रा पार पाडणार आहे.



अशोका पब्लिक स्कूलमध्ये क्रीडा महोत्सवास सुरुवात

# खेळ म्हणजे विजय नव्हे, तर प्रयत्नांचा उत्सव आहे - संजयकुमार चव्हाण



**जालना । प्रतिनिधी -** अशोक भाऊ चव्हाण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था मंठा संचलित अशोका पब्लिक स्कूल मंठा, अशोका पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज हेलस व छत्रपती संभाजी राजे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय हेलस या संस्थेअंतर्गत शाळातील विद्यार्थ्यांची क्रीडा स्पर्धेचे आयोजन प्रजासत्ताक दिनानिमित्त करण्यात आले होते.

शाळेमध्ये क्रीडा महोत्सवाचा भव्य उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. या महोत्सवात विद्यार्थ्यांचा जोश आणि खेळाविषयीची आवड ठळकपणे दिसून आली. संचालक संजयकुमार चव्हाण व पालक प्रतिनिधी कान्होजी रणबावळे यांच्या हस्ते ध्वज उभारून क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी विविध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यामध्ये कबड्डी, खो-खो, धावण्याच्या शर्यती, लांब उडी, गोळाफेक , थाडीफेक, स्लो सायकल आणि इतर मैदानी खेळांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासोबतच सांघिक भावना वाढीस लागावी, शारीरिक तंदुरुस्ती विद्यार्थ्यांमध्ये मिळावी खेळाची आवड निर्माण व्हावी यासाठी हा सालाबादप्रमाणे साप्ताहिक क्रीडा सप्ताहाचे नियोजन अशोक भाऊ चव्हाण सेवा संस्था मंठा तर्फे केले जाते.

प्रमुख पाहुणे कान्होजी रणबावळे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत क्रीडेमध्ये सहभागी होण्याचे महत्त्व सांगितले.

क्रीडा महोत्सवाचे सूत्रसंचालन वंदना मोरे यांनी केले व समारोप विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आली. शाळेचा परिसर विद्यार्थ्यांच्या हर्षोल्हासाने गजबजला असून, सर्वत्र आनंदमय वातावरण पाहायला मिळत आहे.

महोत्सव यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शालेय शिक्षक अनंत निर्वळ, स्वाती हिवाळे, सविता राठोड , प्रियांका चिंचणे, प्राजक्ता कुलकर्णी, राधिका जोशी, आरती कुलकर्णी, कांचन एखंडे, प्रणिता दळवी, ज्योती शहाणे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप छत्रपती संभाजीराजे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य इर्शाद पठाण यांनी केला.

## राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात शपथ

**जालना -** राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त लोकशाहीवर निष्ठा व्यक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी शपथ दिली. शनिवार दि.२५ जानेवारी रोजी शासकीय सुट्टी असल्याने दि.२४ जानेवारी रोजी शपथ घेण्यात आली. कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, नम्रता चाटे, मनिषा दांडगे, सरिता सुत्रावे, जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# वृद्धांच्या सहवासाने आयुष्य, बल, ज्ञान, यशात वृद्धी होते - राधाकृष्णजी महाराज

महाप्रसादाने श्रीमद् भागवत कथा महोत्सवाचा समारोप





**जालना । प्रतिनिधी -** घरातील वृद्धमंडळी म्हणजे चालते बोलते विद्यापीठ आहे. मात्र, त्यांना कोणी वेळच देत नाहीत. सांगतात ते ऐकून घेण्याची तयारी नाही. मित्र आणि मोबाईलमध्ये सर्वजण व्यस्त आहेत. मित्राला वेळ दिल्याने फक्त गप्पा होतात. मोबाईलला वेळ दिल्याने म्हणजे चॅटिंगमधून फक्त आणि फक्त मनोरंजन आणि टाइमपास होतो. मात्र, वृद्धांना वेळ दिला आणि त्यांच्या सहसात राहिल्यास आयुष्य, ज्ञान, बल आणि यशामध्ये निश्चितच वाढ होते. त्यामुळे ज्यांना हे हवे असेल त्यांनी वृद्धांना वेळ देऊन प्रसन्न ठेवावे, असा उपदेश गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज यांनी येथे बोलताना दिला.

श्रीमद् भागवत कथा सेवा समिती आणि सनातन हिंदू समाज यांच्यावतीने भोकरदन रोडवरील ब्रजधाममध्ये आयोजित श्रीमद् भागवत कथेच्या आज शुक्रवारी (ता. २४) समारोपप्रसंगी बोलताना राधाकृष्णजी महाराज यांनी नातेसंबंध, आचरण, कन्या जन्माचे महत्त्व, घरातील वृद्धांची सेवा, उपासनेचे महत्त्व आधी मुद्द्यांवर प्रबोधन केले. यावेळी पं. विजय महाराज पल्लोड, वे. शा. सं. नागेश महाराज पाथ्रुडकर यांची उपस्थिती होती. प्रारंभी मुख्य यजमान शिवरतन मुंदडा यांच्या हस्ते सपत्नीक ग्रंथपूजन करण्यात येऊन, कथेचे आयोजन आणि नियोजनात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडणाऱ्या महिला- पुरुष मंडळींचा सत्कार करण्यात आला.

राधाकृष्णजी महाराज म्हणाले की, वृद्धांकडे आपणास देण्याकरिता काय आहे, असा विचार करणारे बरेच जण आहेत. त्यांच्याकडे असणार तरी काय? कमजोर थरथरते हात, सुरकत्या पडलेला चेहरा, विनादाताचे हास्य बस एवढेच. मात्र, ईश्वराने मनुष्य जीवनासाठी आनंदीमय जीवनाच्या चार महत्त्वपूर्ण बाबींचा महत्वपूर्ण खजाना दिलेला आहे. तो म्हणजे आयुष्य, ज्ञान, बल आणि यश. आपण नमस्कार करतो तेव्हा, माझे आयुष्यही तुला लाभो, असा आशीर्वाद देतात. त्यामुळे आयुष्य वाढते. गुगल आणि पुस्तकात नसलेले गुढ ज्ञान, अनुभव ते सांगतात. त्यामुळे ज्ञानवृद्धी होते. सहवासात राहणाऱ्या घरातील सदस्यांचे ते कौतुक करतात, प्रोत्साहन देतात त्यामुळे कार्यक्षमता वाढून आपल्याला यश प्राप्ती होते. शेवटचा गुण म्हणजे वृद्धमंडळी लाडू, काजू, बदाम, अन्य खाद्यपदार्थ, मौल्यवान वस्तू नेहमी आपल्याजवळ लपवून ठेवतात आणि सहवासातील आवडत्या व्यक्तीला मग ती मोलकरीण का असेना हळूच काढून देतात, त्यामुळे बल वाढते, आत्मविश्वास असे महाराजांनी सांगितले.

रुक्मिणी स्वयंवराच्या अनुषंगाने बोलताना राधाकृष्णजी म्हणाले, माता रुक्मिणीचे माहेर महाराष्ट्राच्या विदर्भातील कौंडीण्यपूर असल्याने द्वारकाधीश श्रीकृष्ण महाराष्ट्राचे जावई आहेत, हे आपले सौभाग्य. वस्त्रदान, अन्नदान, रक्तदान, श्रमदान, विद्यादान आदी दानाचे अनेक प्रकार आहेत. यापैकी सर्वश्रेष्ठ महादान म्हणजेच कन्यादान महाराष्ट्राने भगवान श्रीकृष्णाला केलेले आहे. त्यामुळेच राज्याचे महाराष्ट्र हे नामोधान झाले. सासरवाडी म्हटले की जावई येतातच. ते दरवर्षी येतही असतील, असे सांगून महाराजांनी अनेक विषयाला स्पर्श केला. कुणाची प्रशंसा करण्याला, श्रेष्ठत्व मानण्यास हिम्मत लागते. एकदा कुणाची प्रशंशा केल्यानंतर तो चुकीचे वागू लागलातरी निंदा करू नये. गप्प राहावे; अन्यथा आपले महत्त्व संपुष्टात येते. श्रीकृष्णाला १६ हजार एकशे आठ पत्नी होत्या, याचा चुकीचा अर्थ काढला जातो. या विवाहात भौतिकता अथवा राजा- महाराजांप्रमाणे बहुपत्नीत्वाची लौकिकता नव्हती. शरणागत कन्यांचे जीवन सुरक्षित करण्यासाठी त्यांनी हे सर्व केले, त्यामुळे हा टीकेचा विषय बनू नये. आज महिलांना घरातील पुरुषाचे नव्हे महिलांचे भय वाटू लागले आहे. दोन-तीन मुलीच झाल्यास पती, सासर्याचे नव्हे तर सासू, जाऊ, नणंदा, शेजारील महिला काय म्हणतील याची भीती वाटू लागते, त्यांच्या टोमण्यांचा सामना करावा लागतो. मुलगी जन्माला येणे यात मातेची काय चूक, ती मातृत्वात यशस्वी झाली का? खरे तर मातेने आणखी एका मातेला जन्म देऊन मातृत्व सफल केले. कन्या जन्माचा उपलब्धीच्या स्वरूपात स्वीकार करायला हवा. कन्या ही शक्तीचे प्रतिक आहे. महिलेने महिलेला त्रास न देता एकमेकींना समजून घेत एकमेकींचे बळ बनावे. घरातील पुरुष मंडळी चुकीचे वागत असतील, वाईट संगतीला असतील, रात्री घरी उशिरा येत असतील तर, सासू आणि सुनेने एकीचे बळ दाखवून तंबी दाखवल्यास ही मंडळी वठनीवर आल्याशिवाय राहणार नाहीत. महिलांची त्यांना भीती वाटू लागेल. तुमच्याकडे डोळे वटारूनदेखील पाण्याची हिंमत करणार नाही. महिलेला महिलांची साथ मिळत नाही म्हणून त्या भयभीत राहतात, असे राधाकृष्णजी म्हणाले. आज भागवत कथेचा समारोप होत असलातरी, कथेचे चिंतन, स्मरण करा, गोसेवा करा आणि आपले जीवन सार्थकी लावा, असे ते शेवटी म्हणाले.

कथा महोत्सवाच्या समारोप महाआरतीनंतर ब्रजधाम परिसरात महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला.

युवा आदर्श

**साथ ...**

गरज आहे जोवर
तोवर घनिष्ठ साथ
कार्यभार सरताचं
सरळ पेकाट लाथ
लाडावू नको कुणा
करती आपले घात
वेळीचं दूर सारावे
करण्याआधी मात
वेगावर न नियंत्रण
घडू शके अपघात
अनाहता आमंत्रण
होऊ शके घातपात
उपयुक्तता सरताचं
रूपांतर कस्पटात
डोक्यावर घेई जया
मारायचे कानफटात
आत्मे फिरे अस्वस्थ
सामील होई कटात
उद्रेक करती पक्षात
विस्फोट गटा गटात
दारगोळा सुप्त गुप्त
ठेऊ नकात पक्षात
मित्र रुपामधले शत्रु
नक्की ठेवा लक्षात

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा झाडे जगवा**







हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.